# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.03.2026** **वारः शनिवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते आज आसाम आणि कोलकातामध्ये विविध विकास कामांचे भूमीपूजन, लोकार्पण.
2. लोकसभेत अनुदानाच्या दुसऱ्या टप्प्यातील पुरवणी मागण्या मंजूर, सरकार कोणत्याही आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज असल्याचा केंद्रीय अर्थमंत्र्यांचा निर्वाळा
3. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करण्याचा ठराव मांडण्यासाठी विरोधी पक्षांकडून सूचना सादर
4. भारताला होर्मूझ सामुद्रधुनीमधून लवकरच सुरक्षित मार्ग मिळण्याचे इराणचे संकेत आणि
5. भारत एफआयएच हॉकी विश्वचषक पात्रतेच्या अंतिम फेरीत.

**<u>पंतप्रधान-आसाम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज आसामच्या सिलचर जिल्ह्यातल साडेतेवीस हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या विविध विकास कामांची पायाभरणी होणार आहे. यामध्ये सिलचरमधील उड्डाणपूल, पाथरकंडी कृषी महाविद्यालयाचा समावेश आहे. पंतप्रधान कालपासून आसामच्या दौऱ्यावर आहेत, काल त्यांच्या हस्ते पीएम- किसान योजनेचा 22 वा हप्ता वितरित करण्यात आला. देशभरातील सव्वा नऊ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ होणार आहे. यावेळी बोलताना पंतप्रधानांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार केला. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ आणि शेतीचे आधुनिकीकरण यांना सर्वोच्च प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी एकंदर 19 हजार कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमीपूजन आणि उद्घाटन त्यांनी केलं. तसंच ऑईल इंडिया लिमिटेडचा क्षमता वृद्धी प्रकल्प राष्ट्राला समर्पित केला.

**<u>पंतप्रधान-कोलकाता</u>**

आसाम दौऱ्यानंतर आज पंतप्रधान कोलकाता इथंही 18 हजार कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमीपूजन करतील. या प्रदेशातील रस्त्यांच्या पायाभूत सुविधांना बळ देण्यावर भर दिला असून, त्या अंतर्गत महामार्गांचा समावेश असलेल्या 420 किलोमीटर लांबीच्या रस्ते प्रकल्पांची पायाभरणी मोदींच्या हस्ते होणार आहे. तसंच विविध जहाज वाहतूक, बंदरे, रेल्वे आदींशी निगडीत प्रकल्पांचाही यामध्ये समावेश आहे.

**<u>लोकसभा पुरवणी मागण्या</u>**

लोकसभेनं काल अनुदानासाठीच्या दुसऱ्या टप्प्यातील पुरवणी मागण्यांना मंजुरी दिली. त्या अंतर्गत एकंदर 2 लाख 81 हजार कोटी रुपयांहून अधिक अतिरिक्त खर्चाची मागणी केली आहे. यामध्ये खतं, खाद्य अनुदान आणि संरक्षण सेवा या क्षेत्रांतील वाढीव खर्चासाठी या मागण्या करण्यात आल्या होत्या. लोकसभेत या संदर्भात झालेल्या चर्चेला उत्तर देताना, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सरकार कोणत्याही स्वरुपाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सज्ज असल्याचं सांगितलं. जागतिक आव्हांनांना तोंड देण्यासाठी आर्थिक स्थिरीकरण निधी म्हणून 57 हजार 381 कोटी रुपयांचा प्रस्ताव मांडल्याचं त्या म्हणाल्या.यामुळे पुरवठा साखळीतील अनपेक्षित अडथळ्यांना सामोरे जाता येणार आहे. केंद्र सरकार पुरवठा साखळीतील अडथळे आणि एलपीजी संदर्भातील अडथळ्यांना तोंड देण्यास सज्ज असल्याचं त्यांना सांगितलं. शेतकऱ्यांना खतांची टंचाई भासू नये, यासाठी खत अनुदानापोटी 19 हजार 230 कोटी रुपयांची रक्कम राखून ठेवण्यात आली आहे. जागतिक संकटाच्या

काळात, प्रत्येक सदस्याने पक्षीय मतभेद बाजूला ठेऊन राष्ट्रीय हितासाठी काम केलं पाहिजे असं सीतारमण म्हणाल्या. पुरवणी मागण्यांच्या मंजुरीनंतर सभागृहाचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**उपराष्ट्रपती प्राप्तीकर**

महसूल सेवा अधिकारी हे देशाच्या आर्थिक सामर्थ्याचे रक्षक असल्याचं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. करांमधून संकलित होणाऱ्या महसूलातूनच विकास कामे करणे शक्य होते असंही ते म्हणाले. दिल्लीत काल त्यांनी भारतीय महसूल सेवेतल्या 79व्या तुकडीतील प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. करप्रणाली पारदर्शक, निष्पक्ष आणि करदात्यांसाठी अनुकूल असायला हवीच मात्र करचुकवेगिरीलाही खंबीरपणे तोंड देता आले पाहिजे यावरही राधाकृष्णन यांनी विशेष भर दिला.

**युवासंगम**

शिक्षण मंत्रालय आयोजित युवा संगम कार्यक्रमाच्या सहाव्या आवृत्तीसाठी नावनोंदणी खुली झाली आहे. एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमांतर्गत तरुणांनी मोठ्या संख्येने सहभावी व्हावे असं आवाहन मंत्रालयाने केले आहे. येत्या 18 तारखेपर्यंत संबंधित संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे. तरुणांना विविध राज्ये, केंद्रशासित प्रदेशांना प्रत्यक्ष भेटी देऊन देशाचा समृद्ध वारसा, परंपरा आणि वातावरणाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होते.

**मुख्य निवडणूक आयुक्त**

निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करण्याचा ठराव मांडण्याची मागणी करणारी सूचना तृणमूल काँग्रेससह विरोधी पक्षांच्या संसद सदस्यांनी दोन्ही सभागृहांमध्ये सादर केली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकसभा आणि राज्यसभा सचिवालये या सूचनेचे स्वरूप तपासतील. तृणमूल काँग्रेसच्या सूचनेवर प्रतिक्रिया व्यक्त करताना केंद्रीय मंत्री एस. पी. सिंह बघेल यांनी या पक्षांचा घटनात्मक संस्था आणि लोकशाहीवर विश्वास नसल्याचे वार्ताहरांशी संवाद साधताना म्हटलं आहे. तर, पश्चिम बंगालमध्ये राबवण्यात आलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेदरम्यान अनेक मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा आरोप करत, ही सूचना कायद्याला धरून असल्याचं टीएमसीचे खासदार सौगत रॉय यांनी म्हटलं आहे.

**पश्चिम बंगाल-एसआयआर**

पश्चिम बंगालमध्ये झालेल्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेअंतर्गतची पहिली पुरवणी मतदान यादी पुढील आठवड्यात सादर होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहिती नुसार सुरुवातीच्या यादीमध्ये 60 लाखांहून अधिक नावांचे पुनरावलोकन करण्यात आलं होतं, त्यापैकी 15 लाख नावांच्या प्रकरणांचा निपटारा यापुर्वीच करण्यात आला आहे. ज्यांची नावे यादीत समाविष्ट नाहीत, त्यांच्या प्रकरणांची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थाप करण्यात आलेल्या लवादामार्फत केली जाईल. लवाद स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

**आखाती देश केंद्र**

पश्चिम आशियातील सद्यस्थितीच्या पार्श्वभूमीवर अखंडित ऊर्जा आणि मालवाहातुकीचे महत्त्व भारताने इराणला अधोरेखित करून सांगितलं आहे. आखाती प्रदेशातील अलीकडील घडामोडींसंदर्भात आयोजित आंतर-मंत्रालयीन माहिती सत्रादरम्यान परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेझेशकियन यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली आहे. या प्रदेशातील विशेषतः इराणमधील भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि कल्याण याला केंद्र सरकारचे प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले. संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून प्रश्न सोडवले गेले पाहिजे, या भारताच्या सातत्यपूर्ण भूमिकेचा पुनरुच्चार जैस्वाल यांनी केला. तर होर्मूझ सामुद्रधुनीत एकंदर 27 भारतीय ध्वजधारी जहाजं असल्याची माहिती बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी दिली आहे.

भारतीय खलाशांची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी, तसेच भारताच्या सागरी हितांचे रक्षण करण्यासाठी सरकार पूर्णपणे कटिबद्ध असल्याचं ते म्हणाले. तर भारत पेट्रोल आणि डिझेल उत्पादनबाबत स्वयंपूर्ण असल्याचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी सांगितलं आहे. घरगुती वापराचा पीएनजी आणि वाहनांसाठीचा सीएनजी यांचा पुरवठा कोणत्याही कपातीशिवाय अखंडितपणे सुरू राहील, याची खात्री करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. दररोज 50 लाख सिलिंडर्सचे वितरण केले जात असल्याचे सांगून लोकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये असं आवाहन शर्मा यांनी केलं आहे.

**<u>इराण राजदूत</u>**

भारताला होर्मूझ सामुद्रधुनीमधून लवकरच सुरक्षित मार्ग मिळू शकेल असे संकेत इराणचे भारतातील राजदूर मोहम्मद फथाली यांनी दिले आहेत. दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना फथाली यांनी हा आशावाद व्यक्त केला आहे. भारत आणि इराण यांचे सामाईक हितसबंध आहेत असंही ते म्हणाले.

**<u>अमेरिका कर्मचारी मृत्यू</u>**

गुरुवारी पश्चिम इराकमध्ये झालेल्या विमान अपघातात अमेरिकेच्या इंधन भरणाऱ्या विमानातील सहाही कर्मचारी मृत्यूमुखी पडल्याच्या वृत्ताला अमेरिकेने दुजोरा दिला आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने जारी केलेल्या निवेदनानुसार मित्र राष्ट्रांच्या हद्दीवरून उड्डाण करताना हे विमान बेपत्ता झाले होते. मात्र शत्रूच्या हल्ल्याला विमान बळी पडले नसून पुढील चौकशी सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आलं आहे.

**<u>इराणी नौदल जहाज</u>**

हिंदी महासागरात इराणी नौदल जहाज आयरीस देनावर झालेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या 84 इराणी खुलाशांचे अवशेष श्रीलंकेतून मायदेशी नेण्यात आले. एका विशेष विमानाने शवपेट्या कडक सुरक्षा व्यवस्थेत रवाना करण्यात आल्या. चार मार्च रोजी जहाजावर हल्ला झाला त्यानंतर हे अवशेष श्रीलंकेत आणण्यात आले होते.

**<u>महिला हॉकी</u>**

महिला हॉकीमध्ये भारतानं काल इटलीचा 1-शून्य असा पराभव करत एफआयएच हॉकी विश्वचषक पात्रतेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. हैदराबाद मध्ये झालेल्या या सामन्यात भारताच्या मनिषा चौहाननं 40 व्या मिनिटाला विजयी गोल करत हे यश संपादन केलं. सलीमा टेटेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा अंतिम सामना उद्या इंग्लंडशी होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी 7.30 वाजता सामना सुरू होईल.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.